# अगस्ति सहकारी साखर कारखाना लि.,अगस्तिनगर

ता. अकोले, जि. अहमदनगर
● ग्राम – अगस्तिसाखर, अकोले ● E-Mail ID - agastisakhar@rediffmail.com
● फोन नंबर : (०२४२४) २२२७७५, २२२७१४. फॅक्स नंबर : (०२४२४) २२३२८३

## परिपत्रक

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद/शेतकरी बंधूंना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, कारखान्याचे कार्यक्षेत्रात सन २०१७-१८ चे ऊस लागवड, क्षेत्रावर काही भागामध्ये पांढऱ्या माशीचा तसेच माव्याचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे ऊस पीक करपल्यासारखे होवून वाळणेस सुरुवात झाली आहे. त्याकरीता ऊसावरील पांढरी माशीचे व मावा नियंत्रणाबाबद खालील प्रमाणे उपाय योजना करणे आवश्यक आहे.

१) पट्टा पद्धतीने किंवा रुंद सरी पद्धतीने ऊसाची लागण करावी.
२) खतांच्या मात्रा शिफारशीप्रमाणेच द्याव्यात.
३) फक्त नत्रयुक्त खताचा वापर केल्यास पांढरी माशीचा प्रादुर्भाव वाढतो.
४) खोडव्यास खतांची मात्रा न दिल्यास ही कीड वाढते, खोडव्यास पाण्याचा ताण पडू देवू नये.
५) पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा करावा.
६) पावसाळी आद्रतायुक्त वातावरणात जैविक किटकनाशकाचे परिणाम चांगले मिळतात.
७) किटकनाशकांबरोबर २ टक्के नत्र (युरीया) टाकल्यास पांढऱ्या माशीचे कोश मरण्याचे प्रमाण वाढते.
८) फवारणी करतेवेळी स्टिकरचा वापर करावा.
९) किडग्रस्त शेतात पिवळा रंग दिलेल्या पत्र्याचे किंवा कार्डबोर्डचे सापळे (ग्रीस लावलेले) वाऱ्याच्या दिशेने ठेवल्यास पांढऱ्या माशीची मादी आकर्षित होवून त्यास चिकटते, त्यामुळे शेतातील मादीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.
१०) पांढऱ्या माशीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी पाण्याचा निचरा करणे, पिक फेरपालट करणे आणि एकात्मिक किड नियंत्रण करणे आवश्यक आहे.
११) लाल मावा किंवा लोकरी मावा नियंत्रणासाठी उभ्या पिकांत फोरेट १०-जी विस्कटून/फोकून किंवा पातळ कापडाच्या पुरचुंड्या शेताच्या कोपऱ्यांमध्ये ऊसाला बांधणे गरजेचे आहे.
१२) **किटकनाशक फवारणी** – (कोणतेही एक)

| अ.नं. | किटकनाशकाचे नाव | घटक | एकरी प्रमाणे २०० लि. पाण्यासाठी |
|---|---|---|---|
| १ | टाटा मिडा | इमिडायक्लोप्रीड (१७.८% S.L.) | २०० मिली |
| २ | मियोथ्रीन | फेनप्रोप्रॅथ्रिन (३०% E.C.) | ४०० मिली |
| ३ | प्राईड + आसाटाफ | ॲसिटामाप्रीड (२० % S.G.)<br>ॲसिफेट (७५% W.P.) | ६० ग्रॅम + ४०० ग्रॅम |
| ४ | कॉन्फिडॉर | इमिडायक्लोप्रीड (बायर) | १०० मिली |

१३) **जैविक किटकनाशक फवारणी**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मेटॅरिझीयम + व्हर्टीसीलीयम | मेटॅरिझीयम अनिसोपला + व्हर्टिसीलीयम लेकॅनी | १ लिटर + १ लिटर |

तरी कृपया सर्व ऊस उत्पादक सभासद/शेतकरी बंधूंनी वरील उपाययोजना करून ऊसावरील पांढऱ्या माशीचे नियंत्रण करावे, तसेच अधिक माहितीसाठी ऊस विकास विभाग/कारखाना गट कार्यालयाशी संपर्क साधावा, ही नम्र विनंती.

कळावे,

आपले विनित ,

**बी. एस. घुले**
कार्यकारी संचालक

**सिताराम पा. गायकर**
व्हा.चेअरमन

**मधुकररावजी पिचड**
चेअरमन

**व सर्व सन्माननीय संचालक मंडळ,**
**अगस्ति सहकारी साखर कारखाना लि., अगस्तिनगर,**
ता. अकोले, जि. अहमदनगर

॥ सुजाता ॥ ऑफसेट, सारडा पेट्रोल पंपामागे, अकोले (☎ : २२१३३१)